महा.-४४६/२०१०एफ११२६३
स्थापना : २०११
संस्थेचे बँक खाते क्र. : 42247766630
Ifsc : SBIN0020043
संत नामदेव महाराज
शेलगाव(जं.)
श्री संत नामदेव महाराज
(चिं.मा)बउद्देशीय सामाजिक संस्था शेलगाव (जं.)
ता.- कळंब जि.- धाराशिव
* संस्थेचे मुख्य कार्य *
१) सर्व समाजामध्ये वाढलेली व्यसनाधीनता कमी करणे.
२) सर्व समाजामधील गरीब कुटुंबातील शाळकरी मुलामुलींना शालेय साहित्य व कपडे वाटप करणे. ३) गोशाळा चालवणे. (सदरील संस्था ही 80G, व 12Ap नुसार असून, सदर संस्थेत मदत करून, सामाजिक कार्यास सढळ हाताने मदत करून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.)
कार्यालय पत्ता : बाबा नगर, तवले निवास, कळंब, ता. कळंब जि. धाराशिव
अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२२१४९९९८,९७६३२५३२८०,९६६५२१२५९२

दैनिक
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
newsaksharaj2021@gmail.com
संपादक : विनोद कैलास गोरे

फ्रेंचाईजी देणे आहे
AGRIBLE GLOBAL TRADE PRIVATE LIMITED
Shree Masala
गुंतवणूक २.५ लाख फक्त
आमच्या नामांकित कंपनीची
संपुर्ण महाराष्ट्रात डिस्ट्रीब्यूटरशिप देणे आहे
--- आमची वैशिष्ट्ये ---
५ दिवसात व्यवसाय सुरु
कमी भांडवल जास्त नफा
स्वस्त आणि मस्त प्रोडक्ट
कुणीही हा व्यवसाय करु शकते
सहज, सरळ व सोपा व्यवसाय
तुम्हाला काहीही बनवायचे नाही
ग्राहकांची वाढती मागणी
आमच्या मसाला प्रोडक्ट ची शाखा घ्या व भरपुर प्रॉफीट मिळवा...
संपर्क : ८०८०४९१८६९

• वर्ष ३ रे • अंक २५९ वा • पाने ४
बुलडाणा, सोमवार, दि.२९ एप्रिल २०२४
• RNI NO. : MAHMAR/2022/82056 • किंमत : ३ रुपये



**अक्षराज : आकाश जयस्वाल**
**दि.२८, माहूर (नांदेड) :**
महाराष्ट्रातील साडे तीन शक्तिपीठापैकी एक माहूर गडावरील रेणुका आईच आजच सुंदर छायाचित्र.
**आईचे आजचे दर्शन माहुर गड जय जगदंब**

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कोल्हापूर येथील सभा संपन्न

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.२८, कोल्हापूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कोल्हापूर आणि हातकणंगले लोकसभा महायुती (शिवसेना) उमेदवार संजय मंडलिक व धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ तपोवन मैदान, कोल्हापूर येथे भव्य महाविजय संकल्प सभेमध्ये उपस्थित जनसमुदायाला संबोधित केले. कोल्हापूर जिल्ह्याला छत्रपतींचा इतिहास आहे.

हा जिल्हा देशभक्त लोकांचा असून भगव्याच्या मागे उभा राहणारा जिल्हा आहे. ज्याप्रमाणे प्रभू श्रीरामांच्या हातात धनुष्यबाण आहे, त्याचप्रमाणे कोल्हापूर आणि हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार संजय मंडलिक व धैर्यशील माने यांचे निवडणूक चिन्ह देखील धनुष्यबाण आहे. त्यामुळे धनुष्यबाणाला दिलेले प्रत्येक मत हे विकसित भाराताकरीता मा. मोदीजींना दिलेले मत आहे. ज्यावेळी आमचे सरकार होते, त्यावेळी कोल्हापूर जिल्ह्याला टोलमुक्त करण्याचे काम आम्ही केले. मोदीजींच्या नेतृत्त्वात या जिल्ह्यात अनेक विकासकामे झाली आहेत.या देशाला मा. मोदीजींच्या रूपाने असा नेता मिळाला आहे की, ज्यांनी भारताला वेळोवेळी सुरक्षित करण्याचे काम केले आहे. आपण पाहू शकतो २०१९ नंतर या देशात कोणाचीही बॉम्बस्फोट करण्याची हिम्मत झालेली नाही. आज भारताकडे 'अग्नी मिसाईल' आहे. ज्यामुळे देशाची सुरक्षा अधिक बळकट झाली आहे. तसेच कोरोना महामारीत केवळ ३-४ देशांकडे कोविडची लस होती.अशा परिस्थितीत मोदीजींच्या नेतृत्त्वात शास्त्रज्ञांच्या मदतीने



देशात कोविडची लस निर्माण करून १४० कोटी भारतवासीयांना मोफत लसीचे वाटप केले. गेल्या १० वर्षात मोदीजींनी उज्ज्वला,आयुष्मान भारत, मुद्रा लोन, विश्वकर्मा योजनांसारख्या अनेक योजनांच्या माध्यमातून देशातील प्रत्येक घटकाला सक्षम बनविण्याचे काम केले आहे. म्हणून या निवडणुकीत कोल्हापूरचा हुंकार दिल्लीपर्यंत पोहचवून महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन जनतेला केले.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे केंद्रीय मंत्री रामदास आठवले मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मंत्री उदय सामंत,खा.धनंजय महाडिक,आ.डॉ. विनय कोरे, रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष सदाभाऊ खोत, निवेदिता माने आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## पाणी भरलेले रेमडेसिवीर आणले निलेश लंके यांचा विखेंवर गंभीर आरोप

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, श्रीगोंदा (अ.नगर) :** करोना काळात सुजय विखे यांनी विमानाने जे रेमडीसिवर इंजेक्शन आणले होते त्यात पाणी भरलेले होते. असा गंभीर आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी केला असून असा सर्वोच्च न्यायालयाचा अहवाल असल्याचे देखील त्यांनी सांगितले. लंके श्रीगोंदा तालुक्याच्या दौऱ्यावर होते. त्यांनी दिवसभरात शिवसेना ठाकरे गट तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी यांच्यासोबत संवाद साधला. त्यानंतर संध्याकाळी माजी आमदार राहुल जगताप यांच्या श्रीगोंदा शहरातील निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत लंके यांनी विखेवर ही टीका केली. या पत्रकार परिषदेसाठी बाबासाहेब भोस,धनश्याम शेलार, माजी आमदार जगताप यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच कोरोना काळात सर्वात आधी लसीकरण हे विळदघाटात सुरू झाले. तिथे सुद्धा लसीकरणाच्या नावाखाली करोडो रुपयांची विखेंनी बोगस बिले काढल्याचा घणाघाती आरोप लंके यांनी केला. मी निवडणूक आल्यावर तयारी करणारा नाही. मी सामान्य लोकांसाठी कायम तयार असतो. जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून १९ दिवसात ३५० गावांमध्ये मी पोहोचलो. त्या माध्यमातून मतदार संघाची भौगोलिक परिस्थिती व मतदारसंघातले प्रश्न समजून घेतले. हि निवडणूक आता जनतेनेच हातात घेतली असून आपला विजय निश्चित असल्याचा आत्मविश्वास लंके यांनी व्यक्त केला.

**मी अजितदादांचाच...**



एमआयएमचा एक आणि माझ्याच नावाचा डमी उमेदवार भाजपने उभा केलाय. त्यांनी माझा धसका घेतल्यामुळे ते आता डमी उमेदवार उभे करत असल्याचे निलेश लंके यांनी सांगितले. अजित पवार यांच्याकडून पारनेरमध्ये एवढा निधी घेतला आणि त्यानंतर तुमचं आणि अजित पवार यांचं नेमक काय बिनसलं असे पत्रकारांनी विचारले असता अजित पवार यांच्यासारख्या नेता राज्यात टिकला पाहिजे म्हणून त्यांच्यासोबत होतो. अजित दादा आणि मी एका कुटुंबातील आहोत. ते माझे नेते आहेत असे म्हणत त्यांनी या प्रश्नावर समाधानकारक उत्तर देणे टाळले.

**त्यांच्याकडे केवळ डफडेवाले...**

विखेंनी आपल्याला पारनेरमधून लीड मिळेल असे सांगितले याबाबत विचारले असता चार सहा डफडेवाले हाताशी धरून तुम्ही कसं लीड मिळवणार, मी माझ्या मतदारसंघासाठी दिवस रात्र एक केला आहे. विखेंच्या पायाखालची वाळू सरकली त्यामुळे ते असे वायफळ वक्तव्य करत असल्याचे लंकेंनी मिश्कीलपणे सांगितले.

## माजी आमदाराच्या नाकर्तेपणामुळे पारनेरचा विकास थांबला खा.सुजय विखे यांनी डागली तोफ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अ.नगर) :** स्थानिक माजी आमदाराच्या नाकर्तेपणामुळे पारनेर तालुक्याचा विकास थांबला असून त्यांच्या नियोजन शून्य कारभारामुळे पारनेरचे कोणतेही प्रश्न सुटले नाहीत. असा घणाघात महायुतीचे उमेदवार आणि विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केला.

पारनेर तालुक्याच्या दौऱ्यावर असताना प्रचार सभेत त्यांनी विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला. लोकसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून महायुतीचे उमेदवार सुजय विखे यांनी आपल्या मतदारांच्या गाठीभेटी वाढविल्या आहेत. रविवारी त्यांनी पारनेर मधील कान्हुर पठार भागात बुथ कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांच्यासह भाजपचे जेष्ठ नेते विश्वनाथ कोरडे, माजी जि.प. सदस्य काशिनाथ दाते, तालुका अध्यक्ष राहूल शिंदे, दिनेश बाबर, गोकुळ काकडे, सागर व्यवहारे तसेच इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी खासदार डॉ. सुजय विखे यांनी विरोधकांना



चांगलेच फैलावर घेतले. त्यांनी सांगितले की, पारनेर तालुक्यातील बहुतांश भागात पठारी शेती केली जाते. या भागात शेतकऱ्यांना पाण्याचा मोठा प्रश्न भेडसावत असताना स्थानिक माजी आमदारांनी त्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत.

परिसारात ढोकेश्वर पांडव लेणी, पळशीचे विठ्ठल मंदिर, लवण स्तंभ, कोरठण खंडोबा मंदिर, भालचंद्र गणेश मंदिर, सिध्देश्वर मंदिर अशी विविध स्थळे आहेत, त्यातून पर्यटन विकास साधता आला असता. त्यातून स्थानिकांना रोजगार मिळाला असता, पण स्थानिक माजी आमदारांनी या दृष्टीने कधीही विचार केला नाही. कारण त्यांच्याकडे विकासाचे कोणतेही धोरण नाही. पर्यटन विकासासाठी आमदाराने दमडीचा निधी खर्च केला नाही. त्यामुळे संधी असतानाही पारनेर तालुका पर्यटन विकासापासून वंचित राहिला. पण आता असे होणार नाही. येणाऱ्या काळात केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून पर्यटनाचा विकास केला जाईल असे त्यांनी आश्वासन दिले. या परिसरात मेंढपाळ बांधवांची संख्या मोठी आहे. त्यांच्यासाठी माजी आमदार नेहमीच उदासीन राहिले आहेत. या बांधवांसाठी लोकर प्रकिया केंद्रासाठी निर्णय झाला आहे. त्याचीही कार्यवाही लवकरच सुरू होईल. हा प्रकल्प पारनेर तालुक्याच्या विकासासाठी मोठी संजीवनी ठरणार असून मेंढपाळ बांधवांचा विकास साधला जाणार असे त्यांनी सांगितले. यावेळी मतदारांशी संवाद साधताना त्यांनी देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रूपाने विकसित भारताचे स्वप्न साकार होणार आहे. त्यात पारनेरकरांचा वाटा असणार आहे. यामुळे विकसित भारतासाठी नरेंद्र मोदींना पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

## धुळे, ठाणे, वर्ध्यात उष्माघाताच्या रुग्णसंख्येत वाढ

**दि.२८, मुंबई :** राज्यात दिवसेंदिवस वाढत असलेल्या तापमानामुळे उष्माघाताच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. १ मार्चपासून आतापर्यंत राज्यात उष्माघाताचे १८४ रुग्ण सापडले आहेत. गेल्या दोन आठवड्यांत धुळे, ठाणे व वर्धा या जिल्ह्यांमध्ये उष्माघाताच्या रुग्णांमध्ये सर्वाधिक वाढ झाली आहे. सध्या उष्माघाताचे सर्वाधिक रुग्ण हे धुळ्यात असून, त्याखालोखाल ठाणे, नाशिक आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये रुग्ण सापडले आहेत. राज्यात उष्णतेचा पारा वाढत असून काही जिल्ह्यांमधील तापमान हे ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त आहे. १ मार्चपासून २६ एप्रिलपर्यंत राज्यात १८४ उष्माघाताच्या रुग्णांची नोंद झाली आहे. मागील १४ दिवसांमध्ये १०२ उष्माघाताचे रुग्ण सापडले आहेत. त्यात धुळे, ठाणे आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात उष्माघाताचे रुग्ण सापडले आहेत. १३ ते २६ एप्रिल या कालावधीत सापडलेल्या १०२ रुग्णांमध्ये धुळे जिल्ह्यात १७ रुग्ण आढळल्याने रुग्णांची संख्या २० झाली आहे. त्याखालोखाल ठाणे व वर्ध्यात प्रत्येकी १६ रुग्ण आढळले असून रुग्णांची संख्या अनुक्रमे १९ आणि १६ इतकी झाली आहे. तसेच नाशिक येथे ११ रुग्ण सापडल्याने रुग्णांची संख्या १७ झाली आहे. साताऱ्यात १३ नवे रुग्ण सापडले आहेत.

**मार्चच्या तुलनेत एप्रिलमध्ये रुग्णांमध्ये वाढ**

मार्चपासून तापमान वाढण्यास सुरूवात होते. त्यामुळे १ मार्चपासून उष्माघाताच्या रुग्णांची नोंद केली जाते. राज्यात १८४ रुग्ण उष्माघाताचे आढळले असून, सर्वाधिक रुग्ण एप्रिलमध्ये सापडले आहेत. मार्चमध्ये ४० रुग्ण आढळले तर १ ते २६ एप्रिलपर्यंत १४४ रुग्ण सापडले आहेत.

## थोडक्यात

### कांदा लिलाव न झाल्यास शेतकऱ्यांचा आमरण उपोषणाचा पावित्रा



**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.२८, नांदगाव (नाशिक) :** तालुक्यातील बोलठाण कृषी उत्पन्न उप बाजार समितीत गेल्या एक महिन्यापासून लिलाव बंद असल्यामुळे शेतकरी वर्गाला मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. कृषी उत्पन्न उपचार समिती तात्काळ चालू करावी या मागणीसाठी आज आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आला आहे. एक महिन्यांपासून कृषी उत्पन्न बाजार समितीत लिलाव बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीत लिलाव तात्काळ चालू करून सक्तीची डबल तोलाई वसुली बंद करावी. ज्या वाहनाला हमालाची गरज नाही त्या वाहनाचे मालाची हमाली बंद करावी म्हणजेच काम नाहीतर दाम नाही या उक्तीप्रमाणे,आज शेतकरी आपला शेतमाल घेऊन विक्रीसाठी आणणार आहेत त्यांच्या शेतमालाचा लिलाव न झाल्यास शेतकरी तेथेच उपोषण करणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे

तसे माहितीचे निवेदन शेतकऱ्यांनी तहसीलदार, बाजार समिती संचालक, सचिव व संबंधित अधिकाऱ्यांना दिलेले आहेत.

### मतदानासाठी सवलत न दिल्यास कारवाई

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२८, ठाणे :** जिल्ह्यातील ठाणे,कल्याण आणि भिवंडी या तीन मतदारसंघात २० मे रोजी मतदान आहे.मतदानाच्या दिवशी मतदार म्हणून मतदानाचा हक्क बजावण्यासाठी कामगारांना भरपगारी सुट्टी किंवा दोन ते तीन तासांची सवलत देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशानुसार भरपगारी सुट्टी किंवा दोन, तीन तासांची सवलत न मिळाल्याच्या प्राप्त तक्रारीनुसार संबंधित आस्थापनावर कडक कारवाई केली जाणार आहे.

मतदानाचा हक्क योग्यरीत्या बजावता यावा म्हणून निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असतील तरीही, त्यांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावता यावा म्हणून ही सुट्टी भरपगारी देण्यात यावी ही सुट्टी उद्योग विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व उद्योगसमूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम इतर आस्थापना इत्यादींना लागु राहिल.अपवादात्मक परिस्थितीत कामगारांना पुर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसल्यास दोन, तीन तासांची सवलत कामगारांना देता येईल. मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी किंवा दोन, तीन तासांची सवलत न मिळाल्यास संबंधित कामगार, कर्मचारी यांना ठाणे येथील कामगार उपायुक्तांकडे तक्रार करता येईल.याशिवाय निवडणूक आयोगाच्या सीविजिलवर तक्रार नोंदवता येणार आहे.




## मान्सूनचा सुखद सांगावा

मागील काही वर्षात दुष्काळाने पिचलेल्या महाराष्ट्राला भारतीय हवामान खात्याने सुखद धक्का दिला आहे. भारतीय हवामान खात्याने यावर्षी पडणाऱ्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. हा अंदाज बळीराजासाठी सुखावणारा आहे. कारण यावर्षी सरासरीच्या १०० ते १०३ टक्के इतका पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. यावर्षी देशाच्या उत्तर आणि ईशान्य भागात तसेच महाराष्ट्रासह दक्षिण भागातही सरासरी इतका किंवा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हा अंदाज बळीराजासाठी जितका सुखावणारा आहे तितकाच तो उद्योग जगतासाठीही सुखावणारा आहे.

कारण कोरोनामुळे उद्योग जगताची घसरलेली गाडी अजूनही सावरलेली नाही. त्यात मागील दोन वर्ष राज्यावर दुष्काळाचे सावट होते. या वर्षीही राज्यात भयंकर दुष्काळ असल्याने त्याचा उद्योग जगतावर देखील मोठा परिणाम झाला आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून आहे. शेती हाच भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही देशाची ६० टक्के लोकसंख्या ही शेतीवरच अवलंबून आहे. त्यामुळे तिच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी शेतीचे विशेष महत्व आहे. मागील काही वर्षात देशात दुष्काळ पडला होता. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला होता. कोरोनामुळे देशातील अनेक उद्योग ठप्प पडले होते.

त्यामुळे देशाचा जिडीपी ही घसरला होता अशावेळी शेती क्षेत्राने देशाला वाचवले होते. कोरोना गेल्यानंतर सर्व काही सुरळीत होईल अशी अपेक्षा असतानाच या वर्षी राज्यात आणि देशात पुन्हा भीषण दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. या वर्षी राज्यात अत्यल्प पाऊस पडल्याने राज्यात भीषण दुष्काळ पडला आहे. दुष्काळामुळे राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. राज्यातील पाणी साठा संपत आला आहे. नद्या कोरड्या पडल्या आहेत. धरणे आटली आहे. बोअरवेलला पाणी लागत नाही. नागरिकांना वापरण्यासाठी सोडा पण पिण्यासाठी देखील पाणी मिळत नाही. एका एका हांड्यासासाठी नागरिकांना कैक किलोमिटरची पायपीट करावी लागत आहे. शहरात आठ आठ दिवसांनी टँकर येत आहे. राज्यात दुष्काळ पडल्याने शेतीलाही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. अशावेळी सर्वांच्या नजरा हवामान खात्याच्या अंदाजाकडे लागल्या होत्या. सुदैवाने हवामान खात्याचा सुखद अंदाज आल्याने राज्यातील दुष्काळग्रस्त नागरिकांना सुखद धक्का बसला आहे.

यावर्षी सरासरी इतका पाऊस होणार असल्याने भरघोस पीक येऊन रान आबादानी होणार आहे. शिवाय राज्यातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मिटणार आहे. जर हवामान खात्याने वर्तवलेला अंदाजानुसार पाऊस झाला तर उद्योग जगतावर ही त्याचा सकारात्मक परिणाम होईल. एकूणच हवामान खात्याने वर्तवलेला मान्सूनचा हा सुखद अंदाज सर्वांनाच सुखावणारा आहे.

# एखादा 'गब्बर' इथेही अवतारावा !

हॉटेलवरील कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी लाचेची मागणी करणाऱ्या अन्न आणि औषध प्रशासनातील अन्न सुरक्षा अधिकारी कीर्ती देशमुख यांना लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने २५ हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले. त्यांच्या घराची झडती घेतली असता सुमारे ८० लाखांचे सोन्याचे दागिने, साडेतीन लाखांचा हिऱ्यांचा हार यांसह साडेतीन लाख रुपये रोख असे घबाड सापडले.

यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने एक आलिशान गाडीही जप्त केली. एका हॉटेल व्यावसायिकाकडील अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी देशमुख यांनी ताब्यात घेतले होते. याप्रकरणी हॉटेल व्यावसायिकावर कोणतीही कारवाई न करण्याचा मोबदल्यात देशमुख यांनी त्याच्याकडे एक लाख रुपयांची लाच मागितली होती. हॉटेल व्यावसायिकाने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रार नोंदवून देशमुख यांना पकडून दिले. भ्रष्टाचाराचे कुरण झालेल्या मोजक्या विभागांपैकी एक असलेल्या अन्न आणि औषध विभागातील भ्रष्टाचार म्हणजेच थेट जनतेच्या जीवाशी खेळ.

अन्नधान्यातील भेसळ, हॉटेल आणि उपहारगृहांतील अन्नपदार्थांत केला जाणारा भेसळयुक्त पदार्थांचा वापर, मिठाई बनवण्यासाठी लागणाऱ्या मावा उत्पादनांत केली जाणारी भेसळ, दुधासह दुग्धजन्य उत्पादनांच्या निर्मितीतील भेसळ, पाकिटबंद पदार्थ तयार करण्यासाठी केला जाणारा आरोग्याला हानिकारक रसायनांचा वापर यांशिवाय औषध उत्पादनांतील घातक आणि उत्तेजक रसायनांचा वापर या सर्व बाबी या खात्याच्या अंतर्गत येतात ज्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आहेत. भेसळयुक्त आणि रासायनिक पदार्थांचा वापर केलेले पदार्थ खाऊन विषबाधा तर होऊ शकतेच शिवाय अशा पदार्थांच्या नियमित सेवनाने हृदय, किडनी, यकृत, मूत्रपिंड यांसारख्या अंतर्गत अवयवांना इजा पोहोचू शकते, रक्तदाब, हृदय विकार आणि कर्करोग यांसारखे जीवघेणे विकार जडू शकतात.




हल्ली कमी उत्पादन खर्चामध्ये अधिकाधिक नफा मिळवण्यासाठी अन्नपदार्थांमध्ये सर्रास भेसळ केली जाते, घातक रासायनिक घटकांचा वापर केला जातो. या सर्वांवर प्रतिबंध आणून नागरिकांना सकस, पोषक आणि शुद्ध अन्नपदार्थ मिळतील यासाठी प्रयत्न करणे हे या विभागाचे प्रमुख कार्य आहे. मात्र याच विभागातील अधिकारी आपल्या स्वार्थासाठी नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्यांना रान मोकळे करून देत असतील तर अशांना कठोरात कठोर शासन होणे अत्यंत आवश्यक आहे. सरकारी अधिकारी आणि भ्रष्टाचार हे समीकरण राज्यासह देशभरात प्रचलित झाले आहे. लाच दिल्याशिवाय सरकार दरबारी जमा केलेली कागदपत्रे, फाईल्स पुढे सरकतच नाहीत याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. लाच देणारे देतात म्हणूनच घेणाऱ्यांचे फावते असेही काहीजण म्हणतात. हुंडा घेणे आणि देणे दोन्हीही गुन्हेच आहेत तसे लाच देणे आणि घेणे दोन्हीही गुन्हेच आहेत. अल्प वेळेत आणि अल्प श्रमात सरकार दरबारी काम करून घ्यायचे असेल तर लाच द्यावीच लागते ही प्रथा आज सरकार दरबारी रूढ झाली आहे. कर्तव्यभावनेला तिलांजली देऊन जडलेल्या भ्रष्टाचाराच्या सवयीमुळे सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांमध्ये काम टाळण्याची वृत्ती निर्माण होत आहे. सामान्य नागरिकांच्या मासिक वेतनातून कररूपाने सरकार दरबारी जाणाऱ्या पैशातून ही अधिकारी मंडळी गलेलठ्ठ वेतन घेत असतात. तरीही यांची भूक भागत नाही म्हणून त्याच अन्नदात्याच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्याला लुबाडतात.

शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची एकसंध साखळी असल्याने खालचा अधिकारी कामाचे पैसे मागतो म्हणून वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रारही करता येत नाही. सरळमार्गाने काम करून घायचे असेल, तर त्यासाठी सरकार दरबारी अनेकदा चकरा माराव्या लागतात. पुन्हा पुन्हा कामाचे खाडे नकोत म्हणून सामान्य नागरिक अधिकाऱ्याच्या मागणीप्रमाणे पैसे देतो आणि आपला वेळ वाचवतो, अशा प्रकारची ही प्रक्रिया सरकारी कार्यालयांत अविरतपणे सुरु असते. सामान्य नागरिक वेळ आणि कार्यालयाच्या सुट्या वाचवण्यासाठी भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो. अर्थात या भ्रष्ट क्षेत्रामध्येही काही कर्तव्यनिष्ठ आणि कार्यतत्पर अधिकारी असतात; मात्र यांची संख्या तुलनेने कमी असल्याने सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे.

सरकार दरबारी काम होण्यासाठी दिलेला पैसा हा सामान्य नागरिकांच्या मेहनतीचा आणि प्रामाणिकपणे काम केल्याचा मोबदला असतो. इच्छा नसतानाही तो इतरांना बहाल करताना त्यामागे त्याचा तळतळाटसुद्धा असतो त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याच्या तो कितपत पचनी पडणार ? अध्यात्मशास्त्रानुसार वैयक्तिक स्वार्थासाठी गैरमार्गाने इतरांकडून धन लुबाडणे हे फार मोठे पाप असून त्याच्या फळस्वरूपात लुबाडणाऱ्याची या नाहीतर पुढील जन्मात निश्चितपणे कित्येक पटीने हानी होते. सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचारावर भाष्य करणारा अक्षय कुमार अभिनित 'गब्बर इज बॅक' नावाचा हिंदी चित्रपट मध्यंतरी आला होता.

प्रत्येक सरकारी विभागातील दहा भ्रष्ट अधिकाऱ्यांना गब्बर ताब्यात घेतो आणि त्यापैकि एकाला ठार करून तो सार्वजनिक स्थळी लटकवतो आणि अन्य नऊ जणांना समज देऊन सोडतो. त्याच्या या कृतीमुळे त्या विभागातील सर्व अधिकाऱ्यांना योग्य ती समज मिळून ते सूताप्रमाणे सरळ होतात. गब्बर करत असलेली कृती कायद्याने चुकीची असली तरी त्याच्या या कृतीमुळे समाजातील भ्रष्टाचार नष्ट होत चालल्याने युवकांसह सामान्य नागरिकांचा त्याला पाठिंबा मिळतो. आजमितीला राज्यासह देशातील भ्रष्टाचार इतका कमालीचा वाढला आहे कि प्रत्यक्षात एखादा गब्बर इथेही अवतारवा असे सामान्य नागरिकांना आज वाटत आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी केला राजेश भंडारी यांचा सन्मान...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अ.नगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथील रहिवासी व नगर येथील महावीर उद्योग समुहाचे प्रमुख युवा उद्योजक राजेश भंडारी यांची जैन महासंघाच्या पारनेर तालुकाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल टाकळीढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला.



यावेळी महावीर उद्योग समूहाचे प्रमुख युवा उद्योजक राजेश भंडारी, निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, उपसरपंच रामभाऊ तराळ, माजी उपसरपंच सुनील चव्हाण, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे उपाध्यक्ष मळिभाऊ रांधवण, उद्योजक संतोषशेठ भंडारी, संतोष खामकर, शिराज हवलदार, आमोल आल्हाट, सुभाष जाधव, बबनराव झावरे, लक्ष्मण झावरे, शिवाजी निडुंगे, पत्रकार शरद झावरे आदी उपस्थित होते.

## क्लेप्टामेनिया..

चोरी करण्यामागे
कारणे ती हजार
कधी कुणां जडतो
मानसिक आजार

दिसे वस्तु बेवारस
चोरायचे ये विचार
सेरोटॉनीनचे स्त्राव
रक्तात करी संचार

शिवशिवू लागे हात
मना उपळे विकार
नकळत घडते सारे
चौर्य कर्म अविचार

चोरी करत असता
आनंद मिळे अपार
कशी का करे चोरी
विस्मरण नंतर पार

समजून घ्या रोग्यां
करा मानसोपचार
नको उगा हेटाळणी
महाग पडे धुत्कार

गंडे दोरे बांधू नका
नकोढोंगी चमत्कार
नको शिक्षा ताडण
अंधश्रध्दासोपस्कार

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

## वाचकांचं पत्र !

### मुजोर अधिकाऱ्यांना स्मार्ट पद्धतीने धडा शिकवा !

ऐन उन्हाळ्याच्या काळात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या ऐरोली येथील नागरिकांनी गेल्या आठवड्यात ऐरोली परिसरातील महावितरण कार्यालयाची तोडफोड केली तसेच वितरण विभागाच्या कर्मचाऱ्यांनाही मारहाण केली. सरकारी कर्मचाऱ्यांना मारझोड झाल्याच्या घटना वर्षभर कुठेना ना कुठे सुरुच असतात. नागरिकांच्या सहनशक्तीचा कडेलोट झाला कि नागरिक रुद्रावतार धारण करतात आणि मग असे प्रसंग घडतात. सेवेत असताना सरकारी अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना मारहाण करणे यासाठी स्वतंत्र कायदे आहेत त्यामुळे अशा कायद्याखाली आपल्याला अटक होऊ शकते हे ज्ञात असताना नागरिक हिंसेचे पाऊल उचलतात याचा अर्थ त्यांनी हा निर्णय घेण्याआधी भरपूर काही सोसले आहे हे स्पष्ट होते. सरकारी कामकाजाची गती आणि तेथील भ्रष्टाचार याविषयी सर्वसामान्य नागरिकांना पुरेशी जाण असते. एखाद्या भ्रष्ट अथवा कामचुकार अधिकाऱ्याला मुन्नाभाई एमबीबीएस प्रमाणे गांधींगिरीने उत्तर देणे सर्वांनाच जमते असे नाही. त्यासाठी धाडस आणि हुशारी लागते ती सर्वांकडे नसते. त्याऐवजी अशा कामचुकार कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना इंगा दाखवणे हा त्यातल्या त्यात सोयीचा आणि सर्वांना जमणारा भाग आहे. पावसाळ्याआधी नाल्यांची सफाई नीट झाली नाही, रस्त्यावरील खड्डे वेळेत बुजवले गेले नाहीत तर दरवर्षी संबंधीत अधिकारी आणि कर्मचारी कुठे ना कुठे मार खातातच. परिसरातील कचरा वेळेत उचलला गेला नाही, पूर्वसूचना न देता पाणी गेले आणि २-३ दिवस आलेच नाही अशा एकना अनेक प्रसंगात नागरिकांचा संयम तुटतो. असे काही प्रसंग घडल्यावर सर्वप्रथम स्थानिक लोकप्रतिनिधींसमोर गाऱ्हाणे घातले जाते. काही समस्यांच्या बाबतीत लोकप्रतिनिधीही हतबल झालेले असतात त्यामुळे तेही नागरिकांच्या क्रोधाग्नीत तेल ओतण्याचे काम करतात. पूर्वी सरकार दरबारी समस्या मांडण्यासाठी लिखित अर्ज करावा लागे, त्यासाठी नोकरी व्यवसायातून सुट्टी घेऊन सरकारी कार्यालयांत रांगा लावाव्या लागत. आज मात्र काळ बदलला आहे. आज सर्वच क्षेत्रांत डिजिटलायजेशन झाले आहे. घर बसल्या तुम्ही आपल्या मोबाईलवरून कोणत्याही सरकारी खात्याला अर्ज अथवा तक्रार करू शकता तसेच केलेल्या तक्रारीचा नंतर पाठपुरावाही करू शकता. खालच्या अधिकाऱ्याकडून काम होत नसेल तर त्याची वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रार प्रविष्ट करू शकता, असे करत करत तुम्ही थेट मुख्यमंत्र्यांपासून तर पंतप्रधानांपर्यंत आपली तक्रार पोहोचवू शकता, तेही कमी श्रमात आणि कमी वेळेत. त्यामुळे हातातील स्मार्टफोनचा वापर केवळ गेम्स खेळण्यासाठी आणि रिल्स पाहण्यासाठी न करता विधायक कामांसाठीही करायला हवा ! मुजोर आणि कामचुकार सरकारी अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना आता बळाचा वापर करून नव्हे तर स्मार्ट पद्धतीने धडा शिकवायला हवा !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

## डोंबिवलीतील मोठागाव माणकोली पूल चार दिवस वाहतुकीसाठी बंद



**दि.२८, डोंबिवली :** डोंबिवलीतील मोठागाव येथील माणकोली उड्डाण पूल पुलाच्या वजन भार तपासणीच्या कामासाठी सोमवार (ता. २९ एप्रिल ते गुरुवार (२ मे) या कालावधीत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे, असे फलक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधीकरणाने (एमएमआरडीए) डोंबिवलीतील रस्त्यांवर लावले आहेत.

या पूल बंदच्या विषयावर एमएमआरडीएचे अधीक्षक अभियंता अर्जुन कोरगावकर यांना संपर्क साधला, त्यांनी संपर्काला प्रतिसाद दिला नाही. मुंबई, ठाणे हे अंतर डोंबिवली परिसरातून कमी करणाऱ्या मोठागाव माणकोली उड्डाण पुलाचे काम गेल्या वर्षीच पूर्ण झाले आहे. या पुलाच्या भिवंडी बाजुकडील पूल ते मुंबई-नाशिक-आग्रा राष्ट्रीय महामार्गालगतच्या पोहच रस्त्याचे बहुतांशी काम पूर्ण झाले आहे. डोंबिवली बाजूकडील पुलाचा उतार ते रेतीबंदर रेल्वे फाटकापर्यंतच्या पोहच रस्त्याचे काम एमएमआरडीएकडून सुरू आहे. खाडीवरील पुलाचे काम पूर्ण झाल्याने आणि डोंबिवलीतील प्रवासी वाहनाने अर्धा तासात ठाणे तर एक तासात मुंबईला वाहतूक कोंडी मुक्त वातावरणातून पोहचत असल्याने प्रवासी माणकोली पुलाला आता पसंती देत आहेत.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# नृत्यातून देशाच्या संस्कृतीचे दर्शन !

दरवर्षी २९ एप्रिल हा दिवस आंतराराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा केला जातो. बॅले नृत्याचे आद्य संस्थापक जीन-जॉर्जेस नोवेर यांचा हा जन्मदिवस. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळला जावा असे आंतरराष्ट्रीय नाट्यसंस्था- इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिट्यूशन- आइटीआइने ठरवले. ही संस्था युनेस्कोची भागीदार असलेली स्वतंत्र संस्था आहे. तिच्या आदेशावरून इ.स.१९८२ सालापासून हा दिवस साजरा करण्यात येत आहे. या दिवशी जगप्रसिद्ध आणि त्या वर्षातील सर्वोत्कृष्ट नृत्य कलावंताला जागतिक संदेश देण्यासाठी आमंत्रित केले जाते. नृत्य कलेला आणि नृत्य कलावंताला जगमान्यता मिळावी, या कलेचा उत्कर्ष आणि अधिकाधिक प्रसार व्हावा आणि तिला राजाश्रय मिळावा हा उद्देश, आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस साजरा करण्यामागे आहे. नृत्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते भावना व्यक्त करण्याचेही एक साधन आहे. मग ती एखाद्याबद्दलची नाराजी असो किंवा एखादी गोष्ट साध्य करण्याचा उत्साह आणि उत्सव असो, तुमच्या प्रत्येक भावना इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी तुम्ही नृत्याची मदत घेऊ शकता. इतकेच नव्हे तर नृत्याच्या माध्यमातून समाजात जनजागृती करण्याचे कामही वर्षानुवर्षे केले जात आहे.

दि.२९ एप्रिल १९८२ रोजी युनेस्कोच्या इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिट्यूटच्या आंतरराष्ट्रीय नृत्य समितीने महान नृत्यांगना जीन-जॉर्जेस नवेराच्या वाढदिवसानिमित्त हा दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून दरवर्षी हा दिवस जगभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नृत्यांगना नवेरा ही फ्रान्समधील एक निपुण बॅले डान्सर होती, जीने नृत्यावर लेटर्स ऑन दी डान्स नावाचे पुस्तक लिहिले ज्यामध्ये नृत्याशी संबंधित सर्व गोष्टी आहेत. हे वाचून कोणीही नृत्य शिकू शकेल. आंतरराष्ट्रीय नृत्य दिनाचे उद्दिष्ट केवळ जगातील सर्व नर्तकांचे प्रोत्साहन वाढवणे हाच नाही तर या सर्व नृत्य प्रकारांबद्दल लोकांमध्ये जागरुकता पसरवणे हा आहे, ज्यामध्ये जगातील मोठे नेते आणि सरकारे देखील सहभागी आहेत. नृत्य हा स्वतःचा आनंद आहे आणि तो इतरांनाही वाटून घ्यायचा हाही त्याचा उद्देश आहे. पॅरिसमधील इंटरनॅशनल डान्स थिएटर इन्स्टिट्यूट दरवर्षी ऑनलाइन सेलिब्रेशनचे आयोजन करत असते. त्यावेळी आफ्रिका, आशिया, अमेरिका, युरोप आणि अरब देशांतील नृत्यनिर्मितींना आमंत्रित करण्यात येते. या उत्सवाअंतर्गत जगभरातील नृत्यातील वैविध्य आणि सौंदर्य दाखविण्याचा प्रयत्न केला जात असतो.

नृत्य हे केवळ एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याचाच भाग नव्हे तर काही जणांसाठी नृत्य हे स्ट्रेस बस्टर सुद्धा असते. जगात विविध प्रकारच्या संस्कृती आहेत, त्यांच्या नृत्य प्रकारावरून त्या संस्कृतीचा अंदाज बांधता येतो. नृत्य हे मानवाचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. आपल्या शरीराच्या माध्यमातून विविध प्रकारच्या भावनाना वाट करून देण्याच हे एक उत्तम माध्यम आहे. मनुष्य जीवनातील असलेले नृत्याचे महत्व जगाला पटवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाट्य संस्थाने हा दिवस जगामध्ये साजरा करायला सुरुवात केली. इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिट्यूशन ही युनेस्कोची कला प्रदर्शनासाठी भागिदार संस्था आहे. जगभरातील अनेक प्रसिद्ध डान्सर्स आणि कोरियोग्राफर्स या संस्थेचे सभासद आहेत. या संस्थेने आधुनिक बेले डान्सचा निर्माता समजले जाणारे जॉर्जेस नोवेर यांना सन्मानित करण्यासाठी दरवर्षी २९ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा करण्याचं ठरवलं आहे. जगभर हा दिवस सर्व देशांच्या राजकीय, सामाजिक आणि भौगोलिक सीमा पार पाडून नृत्य करण्याला प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नृत्य ही एक जगातील विविध भागांना त्यांच्या नृत्य प्रकाराने जोडणारी एक भाषा आहे. त्यामुळे फक्त नृत्यकलेच्या माध्यमातून एक सकारात्मक किंवा अर्थपूर्ण संदेश देण्याचा प्रयत्न केला जातो. नृत्याचे प्रकार वेगवेगळे आहेत. अगदी लहान लहान प्रदेशापासून वेगवेगळ्या संस्कृतीची वेगवेगळी नृत्य कला असते-

**१) बेली डान्स या प्रकाराबद्दल माहिती पाहूया.** युरोपमधील लेखक आणि चित्रकारांनी या नृत्य करणाऱ्या जिप्सी महिलांची चित्रे काढल्याने हा नृत्यप्रकाराला युरोपभर लोकप्रियता मिळाली. भटक्या लोकांप्रमाणे बेली डान्सर्सचा एक समूह असायचा, आणि ते फिरतीवर असताना नृत्य करायचे. हा बेली डान्स पाठीचा कणा ताठ ठेवून, कंबरेची जलद गतीने हालचाल करून, त्यासोबतच संपूर्ण शरीर एका लयबद्ध ठेक्यामध्ये हलवणे, अशा प्रकारे करण्यात येणारा बेली डान्स मान आणि पाठीच्या आरोग्यासाठी उत्तम आहे. तसेच हृदयाचं स्पंदन होण्यासाठी, आरोग्य उत्तम राखण्यासाठी हा नृत्यप्रकार अनेक कलाकार व्यवस्थित शिकून घेतात. या नृत्याने एका तासात साधारण ३०० ते ५०० कॅलरीज जाळल्या जातात.

**२) दुसरा प्रकार आहे हिप हॉप.** यामध्ये १९७० मध्ये समोर आलेल्या हिप हॉप या नृत्यप्रकारात अपरॉक, ब्रेकिंग आणि फंक स्टाइल्स या प्रकारांचाही समावेश करण्यात येतो. जमैकन- अमेरिकन डीजे कूल हर्क याला हिप हॉप म्युझिकचा संस्थापक असे संबोधले जाते. हिप हॉप प्रकार अत्यंत ऊर्जादायी आहे. जबरदस्त ऊर्जेनेच तो परफॉर्म करावा लागतो. हिप हॉप संगीतासह स्ट्रीट जॅझ बरोबरही तो केला जातो. हा शांत नृत्य प्रकार नाही. काही निवडक शहरांमध्ये शैक्षणिक कार्यशाळा, प्रकल्प, विविध कार्यक्रम, व्याख्याने आयोजित करण्यात येतात. या कार्यक्रमांतर्गत जगभरामधून एक दिग्गज नृत्य कलाकाराची निवड करून त्यांच्या कडून एक सकारात्मक संदेश दिला जातो. प्रत्येक नृत्यप्रेमींसाठी जणू ही एक पर्वणीच ठरते. गेल्या दोन वर्षांत शांघाय आणि हवाना येथे हे सेलिब्रेशन होते आहे. यामध्ये जगभरातील दिग्गज कलाकार, विद्यार्थी आणि नृत्यप्रेमी आवर्जून हजेरी लावतात.

जगभरामध्ये प्रत्येक वर्षी २९ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी हा नृत्य दिवस मोठ्या उत्साहात जगभरात साजरा केला जातो. पण गेल्या दोनतीन वर्षांपासून सुरू झालेला कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता हा दिवस साजरा करण्यावर अनेक निर्बंध घालून बंधने आणली आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी व्हर्चुअल पद्धतीच्या माध्यमाने हा दिवस साजरा केला जात आहे, हे येथे उल्लेखनीयच!

**!! विश्व नृत्य दिनाच्या सर्व नृत्यप्रेमी बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**- संकलन व शब्दांकन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी.**
**गडचिरोली. जि. गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

# मोदी ज्या पद्धतीने देश चालवतात ते पाहून; शरद पवार यांचा हल्लाबोल



देशात सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आहे. प्रचाराच्या भाषणात राजकीय नेते एकमेकांवर टीका टिप्पणी करत आहेत. आज महाविकास आघाडीची सासवडमध्ये जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ज्या पद्धतीने देश चालवतात ते पाहून चिंता वाटते, असे शरद पवारांनी यावेळी म्हटले.

**शरद पवार काय म्हणाले?**

या लोकसभेची निवडणूक वेगळी निवडणूक आहे. हा देश कोणत्या पद्धतीने चालवायचा हा प्रश्न या निवडणुकीचा आहे. आज नरेंद्र मोदी आणि त्यांचे सहकारी ज्या पद्धतीने देश चालवत आहेत, ते पाहिल्यानंतर चिंता वाटते. देश चालण्याचा अर्थ हा लोकशाहीच्या मार्गाने, लोकांना विश्वासात घेऊन त्यांच्या सहमतीने देशाचा कारभार करणे ही लोकशाहीची गरज आहे. आज काय चित्र दिसते. स्थानिक पातळीवर काय परिस्थिती आहे. पंचायत समितीच्या निवडणुका झाल्या आहेत का? जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या आहेत का? नगर पालिकेच्या निवडणुका झाल्या का? किती दिवसांपासून या निवडणुका झाल्या नाहीत. या संस्था किती दिवसांपासून मोकळ्या आहेत. दोन वर्ष झाले आहेत.

दोन वर्ष तुम्ही निवडणुका घेणार नसाल आणि येथून सुरुवात करणार असाल तर आणखी काही दिवसांनी कदाचित विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका न घेण्याची दुर्बुद्धी या राज्यकर्त्यांना सुचण्याची शक्यता नाकारता येत नाही. ते चित्र आता दिसत आहे, असे शरद पवार म्हणाले. शरद पवार पुढे म्हणाले, नरेंद्र मोदी सांगतात ४०० से पार. पण ४०० से पार कशासाठी? याचा अर्थ असा आहे की, त्यांना हव्या त्या पद्धतीने कायदे करता यावे. हवे तसे कायदे करण्यासाठी लागणाऱ्या खासदारांची सख्या त्यांना हवी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या घटनेत त्यांना बदल करायचे आहेत. यावरुन त्यांच्यावर टीका झाली तर ते सांगतात संविधान बदलण्याचा विचार आमच्या मनात नाही. मी याबाबत एक उदाहरण सांगतो. कर्नाटकाकील एका भाजपाच्या खासदारांनी भाषण करताना सांगितले की, मोदींना या देशाची घटना बदलायची आहे, ती बदलायाची असेल तर कमीत कमी ४०० खासदारांची अवश्यकता आहे. भाजपाचे तीन, चार खासदार हे सांगत आहेत. त्यामुळे देशावर उद्याचे संकट काय असेल? याची प्रचिती आपल्याला यातून येते. त्यामुळे या निवडणुकीकडे अधिक लक्ष देणं गरजेचं, असे शरद पवार म्हणाले.

नरेंद्र मोदी ठिकठिकाणी जातात आणि आम्हा लोकांची आढवण काढतात. टिका टिप्पणी करतात. आता पुण्यातही येणार आहेत. तुम्ही त्यांचे भाषण ऐका. आले की ते म्हणतील, पुणेकरांना माझा नमस्कार. त्यानंतर थोडं काही बोलले की मग शरद पवार किंवा आणखी कोणावर बोलतील. एक दिवस दिल्लीत मोदींनी भाषण केलं आणि सांगितलं, देशामध्ये शेतीच्या कामात शरद पवारांनी क्रांती केली.

त्यानंतर त्यांनी बारामतीमध्ये भाषण केलं. तेव्हा म्हणाले, शरद पवार यांचे बोट धरुन राजकारणात आलो. यानंतर आता निवडणुकीच्या प्रचारात आले आणि म्हणाले, यांना सत्तेपासून दूर करण्यासाठी जे करता येईल ते करा. लोकशाहीमध्ये टीका करण्याचा अधिकार आहे, पण ते सातत्याने भूमिका बदलत आहेत, अशी टीका शरद पवार यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर केली.

सध्या नरेंद्र मोदी भ्रष्टाचाराबाबत बोलत आहेत. भोपाळमध्ये ते म्हणाले होते, महाराष्ट्राच्या सहकारी बँकेमध्ये घोटाळा झाला, पाण्याच्या योजनेमध्ये घोटाळा झाला. आता नरेंद्र मोदी यांनी ज्यांच्यावर आरोप केले, आज ते लोक कुठे आहेत, याची तपासणी केली तर तुम्हाला कळेल, असा टोला शरद पवार यांनी मोदींना लगावला.

# थंड हवेची ठिकाणे तापली, मुंबई ठाण्यात उन्हाचा तडाखा

**दि.२८, मुंबई :** विदर्भासह, मुंबई, पुणे, पश्चिम महाराष्ट्र सध्या उन्हाच्या तडाख्यात होरपळून निघत असताना थंड हवेची ठिकाणेही तापली आहेत. त्यामुळे उकाड्यापासून दिलासा मिळवण्यासाठी थंडाव्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या पर्यटनस्थळी धाव घेणाऱ्या पर्यटकांचाही विरस झाला आहे. माथेरान येथे सरासरी कमाल तापमानाची नोंद ही मुंबईपेक्षाही अधिक आहे तर महाबळेश्वर येथेही पारा चढता आहे.

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, रायगड जिल्ह्यातील माथेरान येथे उन्हाळी सुट्टीत पर्यटकांची गर्दी असते. यंदा मात्र राज्यातील इतर भागांप्रमाणेच या ठिकाणीही उकाडा जाणवत आहे. माथेरान येथे रविवारी सरासरी ३९ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. हे तापमान मुंबईपेक्षाही अधिक होते.

मुंबई शहरात सांताक्रुझ केंद्राने ३८.१ अंश सेल्सिअस तर, कुलाबा केंद्रात ३४.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंदवले. महाबळेश्वर येथे सरासरी ३४.१ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. दरम्यान हवामान विभागाने ठाणे, मुंबईत रविवारी उष्णतेच्या लाटेचा इशारा



दिला होता. त्याचा प्रत्यय मुंबईकरांना आला. सांताक्रूझ येथे कमाल तापमानात शनिवारीपेक्षा दोन अंशांनी वाढ झाली. कुलाबा येथे तापमानात फारशी वाढ झाली नाही, तरी दोन्ही केंद्रावर हंगामी सरासरी तापमानापेक्षा अधिक तापमान नोंदले गेले. सोमवारीही मुंबईत उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला असून कमाल तापमान ३७ ते ३८ अंश सेल्सिअस दरम्यान राहील. ठाणे जिल्ह्यातही पुन्हा एकदा सरासरी तापमान चाळीसपेक्षा अधिक नोंदले गेले. रविवारी सरासरी ४०.८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. पालघर येथे देखील रविवारी कमाल तापमानाचा पारा चाळीस अंशापार गेला.तेथे कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअस नोंदले गेले.

# बाईक रॅलीतून मतदान जनजागृती



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२८, डोंबिवली :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत २४- कल्याण लोकसभा मतदार संघातील, १४२- कल्याण पूर्व विधानसभा मतदार संघात आज मतदार जनजागृतीसाठी, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी गोपीनाथ ठोंबरे आणि अति.सहा. निवडणूक अधिकारी डॉ. स्वाती घोंगडे यांचे मार्गदर्शनाखाली स्वीप पथकातील (मतदार जनजागृतीपथक ) महापालिकेचे शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी विजय सरकटे यांच्या अधिपत्याखाली मतदारांना मतदानासाठी आवाहन करणेकरीता/ प्रोत्साहित करण्यासाठी ड प्रभागक्षेत्र कार्यालय येथून, १४२- कल्याण पुर्व विधानसभा मतदार संघ परिसरात नागरिकांमध्ये मतदानाचे महत्व पटवून मतदान जनजागृतीसाठी बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर रॅलीमध्ये शाळा व महाविद्यालयांचे शिक्षक, पोलिस अधिकारी/कर्मचारी आणि बीट मार्शल यांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. त्याचप्रमाणे १४२ कल्याण पूर्व विधानसभा मतदार संघ परिसरातील गावा- गावातील चौकात जाऊन मतदान करण्याविषयी घोषणा देण्यात आल्या आणि मतदान जनजागृतीपर गीत वाजवून मतदान करणेबाबतचा संदेश नागरिकांना देण्यात आला. यासमयी स्वीप टिमचे कर्मचारी समाधान मोरे, विलास नंदनवार, सर्जेश वेलेकर, प्रणव देसाई, अदिती पवार, प्रियंका पडवळ, प्रतिक्षा भोईर, भारती डगळे उपस्थित होते.

# दिनेश सातपुते यांना पीएचडी प्रदान

**अक्षराज : आश्रुबा कोठावळे**

**दि.२८, कळंब (धाराशिव) :** दिनेश परशुराम सातपुते कळंब यांनी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल एज्युकेशन अँड रिसर्च अहमदाबाद या विद्यापीठाने मेडिसिनल केमिस्ट्री या विषयात पीएचडी ही पदवी प्रदान केली आहे.



त्यांनी अँन्टी कॅन्सर ड्रग तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या केमिकलवर संशोधन करून शोध प्रबंध सादर केला आहे. त्यांचे माध्यमिक शिक्षण कळंब येथे झाले आहे. पुढील पदवीपर्यंत शिक्षण नाशिक मध्ये तर पदवीत्तर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल एज्युकेशन अँड रिसर्च हैदराबाद येथे पूर्ण केले आहे. त्यांनी हा शोध प्रबंध डॉ. दिनेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला या यशाबद्दल दिनेश सातपुते यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# सिद्धांत सुतार याचे प्रज्ञाशोध परीक्षेतील यशाबद्दल कौतुक

**अक्षराज : सतिश तवले**

**दि.२८, कळंब :** सिद्धांत प्रसाद सुतार आदर्श प्राथमिक विद्यामंदिर धाराशिव या शाळेतील इयत्ता पहिली च्या विद्यार्थ्याने ए.टी.एस. प्रज्ञाशोध परीक्षेत महाराष्ट्र राज्यातून सहावा व धाराशिव जिल्ह्यातून तिसरा क्रमांक मिळवला आहे या यशाबद्दल प्रसाद सुतारचा कळंब येथे आजोबा भीमराव पांचाळ यांनी सत्कार करून कौतुक केले याप्रसंगी पांचाळ कुटुंबीय यशवंत पांचाळ, शंकर पांचाळ, विष्णू. पांचाळ सामाजिक कार्यकर्ते सचिन डोरले व समाजातील लोकांची उपस्थिती होती.

# फळभाज्यांच्या दरात १० टक्के वाढ, पालेभाज्यांचे दर स्थिर

**दि.२८, पुणे :** मागणी वाढल्याने लसूण, काकडी, फ्लॉवर, शेवगा आणि घेवड्याच्या दरात १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. कोथिंबिर, मेथी, पुदीन्याचे दर स्थिर आहेत. शेपू, कांदापात, करडई, अंबाडी, मुळा, चाकवत, राजगिरा, चुका, चवळई, पालक या पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी (२८ एप्रिल) राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ते १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून १० ते १२ टेम्पो हिरवी मिरची, आंध्र प्रदेश, कर्नाटकातून प्रत्येकी ३ टेम्पो तोतापुरी कैरी, गुजरात, कर्नाटकातून मिळून ३ ते ४ टेम्पो कोबी, ३ ते ४ टेम्पो घेवडा, पावटा २ ते ३ टेम्पो, भुईमूग शेंग २ टेम्पो, आंध्र प्रदेश, तामिळनाडूतून ५ ते ६ टेम्पो शेवगा, राजस्थानातून २ ट्रक गाजर, हिमाचल प्रदेशातून ५ते ६ ट्रक मटार, मध्य प्रदेशातून ८ ते ९ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून सातारी आले ५०० ते ६०० गोणी, भेंडी ७ ते ८ टेम्पो, गवार ७ ते ८ टेम्पो, टोमॅटो ७ ते ८ हजार पेटी, हिरवी मिरची ३ ते ४ टेम्पो, ढोबळी मिरची १० ते १२ टेम्पो, कोबी ४ ते ५ टेम्पो, फ्लॉवर ४ ते ५ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, काकडी ८ ते १० टेम्पो, पारनेर भागातून ५ टेम्पो मटार, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा ७० ते ८० ट्रक तसेच इंदूर, आग्रा आणि स्थानिक भागातून ३० ते ३५ ट्रक बटाटा अशी आवक झाली. कोथिंबिर, मेथी, पुदीन्याचे दर स्थिर आहेत. शेपू, कांदापात, करडई, अंबाडी, मुळा, चाकवत, राजगिरा, चुका, चवळई, पालक या पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली. मार्केट यार्डातील तरकारी विभागात रविवारी कोथिंबीर दीड लाख जुडी, मेथीच्या ७० हजार जुडी अशी आवक झाली. किरकोळ बाजारात एक जुडी मेथी, कोथिंबिरेचे दर २० ते २५ रुपयांपर्यंत आहेत.